दिनाक ०९.१०.२०२५.

# प्रेसनोट

आरोपी १) रावसाहेब नामदेव पाईकराव, पद सरपंच, ग्रामपंचायत मौजे घोडा, ता. कळमनुरी, जि. हिंगोली २) सोनबा पंडितराव पतंगे, रा. घोडा, ता. कळमनुरी, जि. हिंगोली यांनी तक्रारदार यांचेकडे ५,०००/— लाचेची मागणी करून दि. ०८.१०.२०२५ रोजीचे सापळा कारवाई दरम्यान आरोपी सोनबा पतंगे यांनी ५,०००/— रूपये लाचेची रक्कम स्वत: पंचासमक्ष स्विकारल्याने त्यांचे विरूद्ध पोलीस स्टेशन कळमनुरी, जि. हिंगोली येथे गुन्हा दाखल करण्यात आला.आहे.

---

पिडीत तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, हिंगोली येथे दि. ०६.१०.२०२५ रोजी तक्रार दिली होती की, तक्रारदाराचे वडिलाचे नावे प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत घरकुल मंजूर झाले आहे. त्यांना घरकुलाचा पहीला हप्ता मिळाला असून घरकुलाचा दुसरा हप्ता मिळणेकरीता संयुक्त पाहणी अहवालावर सरपंच यांनी स्वाक्षरी करून अहवाल पुढे पाठवुन घरकुलाचा दुसरा हप्ता मिळवुन देण्यासाठी आरोपी लोकसवेक सरपंच यांनी आरोपी खाजगी इसम यांचे मार्फतीने ५,०००/— रू. लाचेची मागणी केलेबाबत तक्रार प्राप्त झाली.

दिनांक ०६.१०.२०२५ रोजी व दिनांक ०७.१०.२०२५ रोजी यातील आरोपी सरपंच रावसाहेब पाईकराव व खाजगी इसम सोनबा पतंगे यांची लाच मागणी पडताळणी केली. पडताळणी दरम्यान त्यांनी तक्रारदार यांचे प्रलंबित काम घरकुलाचा दुसरा हप्ता मिळणेकामी संयुक्त पाहणी अहवालावर आरोपी सरपंच यांची सही करून अहवाल पुढे पाठवुन घरकुलाचा दुसरा हप्ता मिळवुन देण्यासाठी पंचासमक्ष तक्रारदार यांचेकडे ५,०००/— रू. लाचेची मागणी केल्याचे पडताळणी दरम्यान निष्पन्न झाले आहे.

पडताळणी कार्यवाही दरम्यान आरोपी लोकसेवक सरपंच रावसाहेब पाईकराव यांनी लाचेची रक्कम आरोपी खाजगी इसम सोनबा पतंगे यांचेकडे देण्यास सांगितली. त्यावरून दिनांक ०८.१०.२०२५ रोजी कळमनुरी तहसिल कार्यालयाच्या समोरील परिसरात कळमनुरी येथे आरोपी खाजगी इसम सोनबा पतंगे यास तक्रारदार यांचेकडुन त्यांचे प्रलंबित घरकुलाचे संयुक्त पाहणी अहवालावर सरपंच यांची सही घेवुन अहवाल पुढे पाठवण्यासाठी ५,०००/— रू. लाचेची रक्कम पंच साक्षीदार यांचे समक्ष घेताना रंगेहाथ पकडण्यात आले.

त्यांचे विरूद्ध पोलीस स्टेशन कळमनुरी येथे गुरनं ५४५/२०२५ कलम ७, ७ अ, १२ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी मा. श्री संदीप पालवे, पोलीस अधिक्षक, मा. श्री अशोक कदम, अपर पोलीस अधिक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली श्री विकास घनवट, पोलीस उपअधिक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली, श्री राजेश मलपिलु, पोलीस निरीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली, सपोउपनि युनूस शेख, विजय शुक्ला, पोह फुपाटे, पो.शि. पुंडगे, वाघ, जाधव, चापोह शेख अकबर सर्व अँन्टी करप्शन ब्युरो यांचे मदतीने यशस्वीपणे पुर्ण केलेली आहे.

अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालय हिंगोली तर्फे सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकिय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असल्यास अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालय हिंगोली यांचेशी संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी अँन्टी करप्शन ब्युरोचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारी बाबत माहिति पाहीजे असल्यास खालील नमुद क्रमांकावर संपर्क साधावा.

**मा. श्री संदीप पालवे, पोलीस अधिक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, नांदेड,**
**मो.क्र. ९५४५५३१२३४/९२२६४८४६९९.**
**श्री विकास घनवट, पोलीस उपअधिक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली, मो.क्र. ९८२२२५९९३२.**
**टोल फ्रि क्रमांक १०६४, लँन्ड लाईन क्रमांक ०२४५६—२२३०५५.**
**व्हॉट्सअप क्रमांक ९३५९१२८८८९/९४२२०६१०६४.**

कार्यालय पोलीस उपअधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली
सत्यमेव जयते

09/10

( विकास घनवट )
पोलीस उपअधिक्षक,
अँन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली.

CamScanner